स्थापना

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७

www.apmcpune.in / Email: admin@apmcpune.in, kubspune37@rediffmail.com

जा.क्र.प्रशा/आस्था-१/स्वा.वि.पॉ.नु.प्र.प./ ८४२ /२०२६-२७

दिनांक : ०४/०७/२०२६

## प्रसिध्दी पत्रक

**विषय :-** कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या कायम सेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या समूह स्वास्थ्य विमा पॉलिसीचे नूतनीकरण करणेकामी दरपत्रके सादर करणेबाबत.

वरील विषयास अनुसरून सर्व विमा कंपनी / प्रतिनिधी / ब्रोकर यांना कळविणेत येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या कायम सेवेतील १५४ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रती कुटुंबाला (family floater) विमा मुल्य रक्कम रुपये ४,००,००० लाख या समूह स्वास्थ्य विमा पॉलिसीचे दिनांक २०/०७/२०२६ ते १९/०७/२०२७ या १ वर्ष कालावधीसाठी नूतनीकरण करणेकामी दरपत्रके मागवित आहोत. सोबत सध्याची विमा पॉलिसी, क्लेम रेशिओ, अधिकारी / कर्मचारी व त्यांचे कुटूंबातील सदस्यांची यादी जोडली आहे.

सदर समुह स्वास्थ्य विमा पॉलिसिचे नुतनीकरण करणेस इच्छुक असणाऱ्या विमा कंपनी / प्रतिनिधी / ब्रोकर यांनी त्यांचे वार्षिक प्रिमियम चे दरपत्रके दिनांक १३/०७/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपावेतो बाजार समितीचे श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११०३७ येथील मुख्य कार्यालयातील आस्थापना विभागामध्ये खालील नियम व अटींचे अधिन राहून पोहोच करावे.

१. स्वास्थ विमा पॉलिसीचे नुतनीकरण हे बाजार समितीचे कायम सेवेतील १५४ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कुटुंबातील सदस्य म्हणजे पती, पत्नी व २५ वर्षाखालील २ मुले यांची संख्या २७८ असे एकुण ४३२ सदस्यांसाठी करावयाची आहे.
२. दरपत्रके सादर करताना त्यामध्ये स्वास्थ्य विमा संबंधित मिळणारे कव्हरेजेस नमूद करावेत.
३. मुदतीनंतर दरपत्रके स्विकारले जाणार नाही.
४. दरपत्रके उघडतेवेळी संबंधित विमा कंपनी / प्रतिनिधी / ब्रोकर यांनी बाजार समितीचे मुख्य कार्यालयात वेळेत हजर रहावे.
५. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक १५/०७/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता बाजार समितीचे मुख्य कार्यालयात निम्नस्वाक्षरीकार यांचे समक्ष उघडणेत येतील. दरपत्रके उघडणेचे वेळेत बदल झाल्यास संबंधितांना दुरध्वनीव्दारे कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.

सचिव सभापति

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७